# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## अग्निशामक दल

**मध्यवर्ती मुख्य अग्निशामक केंद्र, कार्यालय**

रविवार पेठ, अग्निशामक दल, सोलापूर - ४१३००५. फोन : ०२१७-२७४०३६४/१०१


संदर्भ : जा.क्र. सा.आ.अ / अ.शा.द./ ४९४ दिनांक : १२/ ७/ २०१९

## -:: प्राथमिक दाखला ::-

प्रति,
**मा. प्रिन्सिपल,**
**माईर्स विश्वशांती गुरुकुल स्कुल केगांव,**
**दुध पंढरीच्य समोर, सोलापूर – पुणे रोड, केगांव**
**सोलापूर. - 413255**

**विषय :-** नियोजीत इमारतीकरिता अग्निशामक दलाचा प्राथमिक ना - हरकत दाखला मिळणेबाबत. (Building – 1 व Building - 2)
**संदर्भ :-** आपलेकडील संदर्भ पत्र क्रं. निरंक, दि. 25/06/2019 रोजीचे विनंती अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत वरील नमुद संदर्भातील पत्रास अनुसरुन, आपण वरील नमुद ठिकाणी नियोजित (Building –1व Building-2)करिता अग्निशामक दलाचा प्राथमिक ना-हरकत दाखला मिळणेबाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सदर नियोजित बांधकाम कामी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव रक्षक अधिनियम 2006 मधील तरतुदीनुसार संपूर्ण फायर फायटींग व्यवस्था होणे आवश्यक आहे.

1) सदर इमारतीस नियमानुसार साईड मार्जिन, अग्निशामक वाहन ये - जा करण्याकामी सतत मोकळी ठेवावी.

2) सदर इमारतीमध्ये 10,000 लिटर क्षमतेचे ओव्हर हेड टँक व अंडर ग्राऊंड टँक 50,000 लिटर क्षमतेचे फायर फायटींगसाठी सतत पाण्याचे स्टोअरेज राहील असे असावे.

3) इमारतीच्या आतील भागामध्ये, प्रत्येक जिन्याच्या ठिकाणी ए. बी. सी./डी. सी. पी. फायर सिलेंडर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. (Cease Fire, Life Guard, Safeex).

4) सदर इमारतीमध्ये डाऊन कमर, (जिदंल, टाटा) प्लेरवर फायर फायटींग व्हॉल्व बसवावे.

5) इमारतीच्या समोरील भागामध्ये टू वे फायर इन लेट अग्निशामक दलास सहज उपलब्ध होईल अशा ठिकाणी बसवावे.

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
अग्निशामक दल
मध्यवर्ती मुख्य अग्निशामक केंद्र, कार्यालय
रविवार पेठ, अग्निशामक दल, सोलापूर - ४१३००५. फोन : ०२१७-२७४०३६४/१०१

संदर्भ : जा.क्र. सा.आ.अ / अ.शा.द./261 दिनांक : 03/06/२०१९

# :: नुतनीकरण दाखला ::

प्रति,
**माईर्स विश्वशांती गुरुकूल स्कूल**
**दूध पंढरी समोर,**
**सोलापूर पुणे-रोड,केगांव,**
**सोलापूर-413255**

**विषय** : अग्निशामक दलाचा नुतनीकरण दाखला मिळणेबाबत.
**संदर्भ** : आपणाकडील संदर्भ पत्र क्रं. निरंक, दि. 03/06/2019 चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भातील पत्रास अनुसरुन, आपण वरील शाळेकरिता अग्निशामक दलाचा नुतनीकरण दाखला (*Building "3"*) मिळणेबाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सबब सदर वरील नमूद शाळेकरिता या ठिकाणी अग्निसुरक्षीतता बाबत तपासणी करीता अग्निशामक साहित्य व उपकरणे चालू सुस्थितीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर शाळेकरिता सन मार्च-2020 साला करिता अग्निशामक दलाचा नुतनीकरण दाखला देण्यात येत आहे.

- फायर एस्टींग्युसर यांचे वेळच्यावेळी परिक्षण व रिफेलिंग करणे.
- सदर ठिकाणी नियुक्त सुरक्षा रक्षक व कर्मचारी, यांना वरील यंत्रणा व उपकरणे (आग विझवण्याची) हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.
- आग विझवण्याची साधनांची देखभाल व निगा वेळच्यावेळी करण्यात यावे.

सदरचा दाखला हा शाळेकरिता आवश्यक ते इतर सर्व शासकिय परवाना घेण्याच्या अटीस अधीन राहून सदरचा (सन मार्च- 2020) अखेर दाखला देण्यात येत आहे.

मा. कळावे,
दिनांक :- 03/06/2019

3/6/2019

अधिक्षक
अग्निशामक दल
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## अग्निशामक दल

**मध्यवर्ती मुख्य अग्निशामक केंद्र, कार्यालय**

रविवार पेठ, अग्निशामक दल, सोलापूर - ४१३००५. फोन : ०२१७-२७४०३६४/१०१


संदर्भ : जा.क्र. सा.आ.अ / अ.शा.द. दिनांक : / /२०१

6) सदर इमारतीमध्ये फायर पंप इन्सटॉलेशन, इमरजिन्सी लाईटींग सिस्टीमसाठी स्वतंत्र बॅकअप (उदा. डी. जी. सेट) सिस्टीम असावी.

7) सदर इमारतीमध्ये अग्निशमन व्यवस्था बसवण्याचे काम गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्र यांच्याकडील अधिकृत परवाना धारकांकडूनच करुन घेण्यात यावी.

8) फायर एक्झीट, धोकादायक, नो - स्मोकिंग वगैरे बोर्ड लावण्यात यावे.

9) होजरील ड्रम व हैड्रंट वॉल्व हे गन मेटल/एस. एस. व आय. एस. आय. मार्कचे असावे. (Life Guard, New Age).

10) इमारतीतील प्रत्येक मजल्यावर फायर होज बॉक्स, 63 एम. एम. होस पाईप (रबर लाईन) व स्टॅन्डरड ब्रॅन्च, आय. एस. आय. मार्क असलेले ठेवण्यात यावे.

11) सदर इमारतीमध्ये फायर हायड्रंट (Hose Reel) सिस्टिम बसविण्यात यावे.

सदर वरील नमुद बांधकामाच्या ठिकाणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव रक्षक अधिनियम 2006 नुसार फायर फायटींग सिस्टीम करुन घेण्याच्या अटीवर अग्निशामक दलाचा प्राथमिक ना - हरकत दाखला देण्यात येत आहे. वरीलप्रमाणे नमुद व्यवस्था झाल्यानंतर अग्निशामक दलाकडून तपासणी करुन, तदनंतर अग्निशामक दलाचा अंतिम ना - हरकत दाखला देण्यात येईल.

सदर बांधकामाकरिता आवश्यक ती इतर सर्व शासकीय परवाने घेण्याच्या अधीन राहून सदरचा प्राथमिक दाखला दिला असे. अग्निशामक दलाचा अंतिम ना-हरकत दाखला घेण्याअगोदर म.न.पा. बांधकाम परवाना दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर दाखल्याची वैधता एक वर्ष (सन-2020) पर्यंत राहील. तदनंतर मुदतवाढीस अथवा अंतिम दाखल्याकरिता प्रकरण फेर सादर करावे.

मा. कळावे,
दिनांक :- 12/07/2019

12/7/2019

अधिक्षक
अग्निशामक दल
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर